<u>**नियमीत दिवाणी दावा क्र.१०१/२०२६ - निशाणी क्र.०१ वरील आदेश**</u>

मयुरेश माळी वि. मधुकर माळी इ.

सी.एन.आर. क्र.-एम.एच.एस.ओ.२०००-०००४७८-२०२६

प्रस्तुतचा दावा आजरोजीचे लोकअदालतमध्ये ठेवण्यात आला आहे. वादी आणि प्रतिवादी हे त्यांच्या विधिज्ञांसह आजरोजी लोकअदालत पॅनेलसमोर हजर झाले आहेत. वादी तर्फे प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेचा दाखल केलेला होता. उभय पक्षांनी आजरोजी नि.क्र.१० अन्वये एकत्रीत तडजोड पुरसीस दाखल केले आहे. सदर तडजोड पुरसीस मधील मजकूर वाचून दाखविला असता पक्षकारांनी मजकूर मान्य केला. उभय पक्षांनी प्रस्तुतचा दावा तडजोड पुरसीसमध्ये नमुद केल्याप्रमाणे तडजोडीने आपसात मिटविला आहे. त्यानुसार संपूर्ण दावा मिळकतींमधील उभय पक्षांचे हिस्से ठरविण्यात आले आहेत. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>**आ दे श**</u>

१. प्रस्तुतचा दावा तडजोड पुरसीस नि.क्र.१० प्रमाणे तडजोड झाल्याने निकाली काढण्यात येत आहे.

२. तडजोड पुरसीस प्रस्तुत आदेशाचा भाग समजण्यात यावा.

३. तडजोड पुरसीस प्रमाणे ॲवार्ड तयार करण्यात यावा.

४. नियमाप्रमाणे कोर्ट फी परत देण्याबाबतचा दाखला देण्यात यावा.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.03.14 16:13:22 +0530

सांगोला.
दिनांक – १४/०३/२०२६

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
पॅनेल प्रमुख, राष्ट्रीय लोकअदालत,
सांगोला.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Panel Head, National Lok Adalat, Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 14/03/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 14/03/2026 |